ePaper

## थोरातांचे गटनेतेपद अडचणीत? पोटनिवडणुकीनंतर निर्णयाची शक्यता!



| वर्ष - 6 । अंक - 292 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- कसबा भाजपाला जड!
- भाजपचे शक्तीप्रदर्शन!
- तीन भूकंपांमुळे टर्कीमध्ये मोठी जीवितहानी
- प्रभात दुध कंपनीच्या विरोधात शेतकरी आक्रमक

www.mahaenews.com | मंगळवार, दि.7 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# दादांचा निर्धार; निवडणूक लढवणार!

## 'मविआ'चा आज उमेदवारी अर्ज: नाव गुलदस्त्यात; पण संकल्प विजयाचा!





**। पिंपरी । महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी ।**

**देगलूर, पंढरपूर, कोल्हापूरच्या पोटनिवडणुका बिनविरोध झाल्या नाहीत. पण, त्यानंतरच्या पोटनिवडणुका बिनविरोध करण्यासाठी भाजपाने आटोकाट प्रयत्न सुरू ठेवले आहेत. मात्र, राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत. चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या "घड्याळ" चिन्हावर महाविकास आघाडीचा उमेदवार उद्या, दि. ७ फेब्रुवारी रोजी अर्ज दाखल करेल, अशी माहिती अजित पवार यांनी दिली.**

रावेत- किवळे येथील एका हॉटेलमध्ये सोमवारी रात्री अजित पवार यांनी निवडक नेत्यांची बैठक घेतली. यावेळी मावळचे आमदार सुनील शेळके, इच्छुक उमेदवार नाना काटे, भाऊसाहेब भोईर, मयूर कलाटे आदी उपस्थित होते.

मुंबईतील अंधेरीची पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या विनंतीला मान देत भाजपाने आपला उमेदवार मागे घेतला. त्याचप्रमाणे पवारसाहेबांनी आताही पुढाकार घ्यावा आणि चिंचवड, कसब्याची पोटनिवडणूक बिनविरोध करावी, अशी अपेक्षा भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. मात्र, अजित पावर ही निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत.

### "तुम्ही काय मला मूर्ख समजता का?"...

"तुम्ही काय मला मूर्ख समजता का?" असा संतप्त सवाल विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी आज पत्रकारांना केला. चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीसाठी महाविकास आघाडीचा उमेदवार अद्याप ठरलेला नाही. याबाबत आज अजित पवार यांना पत्रकारांनी विचारले असता घड्याळाच्या चिन्हावरच उमेदवार निवडणूक लढवेल असे त्यांनी सांगितले त्यावर उमेदवार राष्ट्रवादीचा असेल की, आयात असेल? असा प्रश्न केला असता हातवारे करत आयात असेल का ? फलाना असेल का ? तुम्ही काय मला मूर्ख समजता का ?असा प्रश्न अजित पवार यांनी पत्रकारांना केला. जो उमेदवार दिला जाईल त्याचे नाव उद्या सांगूच असेही पवार यांनी सांगितले.

# अंधेरीप्रमाणे चिंचवड, कसब्याची पोटनिवडणुका बिनविरोध व्हावी'

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची अपेक्षा

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



**मुंबईतील अंधेरीची पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार (CHINCHWAD BYE-ELECTION) यांनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या विनंतीला मान देत भाजपने आपला उमेदवार मागे घेतला. त्याचप्रमाणे पवारसाहेबांनी आताही पुढाकार घ्यावा आणि चिंचवड, कसब्याची पोटनिवडणूक बिनविरोध करावी, अशी अपेक्षा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.**

चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या भाजप, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय, राष्ट्रीय समाज पक्ष व शिवसंग्राम युतीच्या अधिकृत उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी आज (सोमवारी) उमेदवारी अर्ज दाखल केला.त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. ते म्हणाले, "अश्विनीताईंचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी संपूर्ण चिंचवडची जनता घराबाहेर पडली होती. सर्वांनी रॅलीत सहभाग घेतला. प्रचंड मोठा जनसमुदाय रॅलीत सहभागी झाला होता. माझ्या आयुष्यात एवढी मोठी रॅली पहिल्यांदा बघितली. महाराष्ट्राचा इतिहासात आजपर्यंत कोणाचा विजय झाला नाही. इतक्या मोठ्या मताधिक्याने जनतेने अश्विनीताईला निवडून द्यावे".

### जनमताची ही निवडणूक बिनविरोध व्हावी

"निवडणूक बिनविरोध करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मी स्वत: शरद पवारसाहेब, अजित पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले या सर्वांशी आम्ही बोललो आहोत. त्यांना मी भेटायलाही तयार आहे. अंधेरीची पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासाठी पवारसाहेब, उद्धवजी यांनी विनंती केली होती. त्यानंतर आम्ही आमच्या उमेदवाराचा अर्ज मागे घेतला. चिंचवडच्या प्रत्येक घरातून जनसागर उसळला आहे. जनमताची ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी मागणी आहे. चिंचवड आणि कसबा पेठची निवडणूक बिनविरोध करण्याची महाविकास आघाडीला विनंती आहे. आमची स्टार प्रचारक जनताच आहे", असेही बावनकुळे म्हणाले.

# कसबा भाजपाला जड!

## » रविंद्र धंगेकरांचे तगडे आव्हान : बापट अन् बीडकरांनाही फोडला होता घाम








।पुणे । महाईन्यूज ।
हरिचंद्र पवार

**कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे रवींद्र धंगेकरांना उमेदवारी दिली आहे. या मतदार संघातून आमदार, खासदार म्हणून प्रतिनिधी असलेले गिरीश बापट तसेच सभागृह नेता असणारे गणेश बीडकर यांना एकेकाळी रवींद्र धंगेकर यांनी घाम फोडला होता. त्यामुळे ही पोटनिवडणुक भाजप जिंकण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार असून, धंगेकर भाजपला डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे.**

भाजप आमदार मुक्ता टिळक यांचं 22 डिसेंबर रोजी वयाच्या 59 व्या वर्षी निधन झाल्यानंतर कसबा पेठ विधानसभेत पोटनिवडणुक होत आहे. या पोटनिवडणुकीसाठी 27 फेब्रुवारी 2023 रोजी मतदान होत असून त्याची मतमोजणी ही 02 मार्च रोजी होणार आहे. तर 06 फेब्रुवारी 2023 पर्यंत अर्ज भरण्याची शेवटची मुदत असणार आहे. या पोटनिवडणुकीसाठी भाजपकडून भाजपकडून स्थायी समितीचे तीन वेळा तर 4 वेळा नगरसेवक राहिलेले हेमंत रासने यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

कसबा पेठ या विधानसभा मतदार संघावर मागील गिरीश बापट यांनी 25 वर्ष प्रतिनिधित्व केलं आहे. 2009 ते 2014 या विधानसभेच्या निवडणुकीत गिरीश बापट आमदार म्हणून निवडून आले होते. त्यानंतर गिरीश बापटांना भाजपने लोकसभेचं तिकीट दिल्याने ते खासदार झालेत, अन् त्यांच्या जागी 4 वेळा नगरसेवक आणि पुणे महानगरपालिकेच्या महापौर म्हणून राहिलेल्या मुक्ता टिळक यांना 2019 विधानसभेसाठी उमेदवारी दिली. त्यानंतरही मुक्ता टिळक विजयी होऊन भाजपने हा मतदार संघ विजयी झाल्या होत्या.

### तेव्हा बापटांनाही घाम फोडला होता

कॉंग्रेसकडून या पोटनिवडणुकीकरीता रविंद्र धंगेकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. रविंद्र धंगेकर सलग चार वेळा नगरसेवक म्हणून रविवार पेठ व त्या परिसरातील प्रभागातून निवडून आले आहेत. शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना व आता कॉंग्रेस असा धंगेकरांचा राजकीय प्रवास राहिला आहे. सुरूवातीला त्यांनी मनसेचा त्याग केला. त्यानंतर कॉंग्रेसमध्ये प्रवेश न रविंद्र धंगेकर यांची ओळख प्रचंड प्रमाणात उदयास आली. 2009 मध्ये मनसे तर्फे कसब्यातून विधानसभा निवडणुक लढवत असतांना धंगेकर यांनी बापटांना अक्षर:श घाम फोडला होता. त्यावेळी त्यांचा अवघ्या 8 हजार मतांनी पराभव झाला होता. 2014 च्या विधानसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदीची राज्यात लाट असतांनाही धंगेकर यांनी आव्हान दिले होते. त्या निवडणुकीत गिरीश बापट यांना 54 हजार 982 तर धंगेकर यांना 46 हजार 820 इतकी मतं मिळाली होती. आता पुन्हा एकदा रविंद्र धंगेकर यांनी भाजपला आव्हान दिले आहे.

### ब्राम्हण समाज नाराज

मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर त्यांचे पती शैलश टिळक पोटनिवडणुक लढवण्यासाठी आग्रही होते. परंतु त्यांना डावलून हेमंत रासने यांना उमेदवारी देण्यात आली आहेय. यावर शैलेश टिळकांनी भाजपवर नाराजीही व्यक्त केली आहे. तसेच काल पुण्यात कसबापेठ मतदार संघातील काही पोस्टर नाराजीचे पोस्टर झळकले. त्यात कुलकर्णीचा मतदार संघ गेला, टिळकांचा मतदार संघ गेला, आता नंबर बापटांचा का ? समाज कुठवर सहन करणार ? असा रोष ब्राम्हण समाजाकडून व्यक्त करण्यात आला. त्यामुळे शैलेश टिळक यांना डावलून हेमंत रासनेंना उमेदवारी दिल्याने याठिकाणी ब्राम्हण समाजही भाजपवर नाराज असल्याचं दिसून येत आहे. तर दुसरीकडे आता महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून रविंद्र धंगेकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मागील काही वर्षाचा काळ बघता, धंगेकर यांनी या मतदार संघावर चांगलीच पकड मजबूत केली आहे. तसेच रविंद्र धंगेकर यांना मानणारा सध्या मोठा वर्ग तयार झाला आहे. यातच धंगेकर यांना आता शिवसेना, राष्ट्रवादी, वंचितही साथ मिळणार असल्याने या पोटनिवडणुकीत रविंद्र धंगेकर यांचं पारडं भाजपवर अधिक असल्याचं दिसून येत आहे.

### कसबा पेठ मतदारसंघात जातीय समीकरणं

» कसबा पेठ विधानसभेत पुणे महापालिकेतील 41, 76, 78,81 ते 82, 91 ते 94, 103, 105, 118, 120 ते 124 या वॉर्डचा समावेश होतो. यामध्ये पुण्यातील सदाशिव, नारायण, शनिवार, रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार आणि कसबाया पेठांचा समावेश होतो. त्याचबरोबर शनिवार वाडा, दांडेकर फुल मंडईची मुख्य बाजारपेठ, नवी पेठ, लोकमान्य नगर या भागाचाही समावेश आहे. या मतदार संघात जातीचं समीकरणंही फार महत्वाच राहिलं आहे. सोमवार पेठ, फडके हौद, बुधवार पेठ, नाना पेठ, मंडई सारख्या भागामध्ये धंगेकर यांना मानणारा वर्ग मोठ्या संख्येने आहे. मराठा, ओबीसी वर्ग यांचा 35 टक्के, तर ब्राम्हण समाज 25 ते 30 टक्के मराठा समाज 18 टक्के मुस्लिम समाज याठिकाणी 10 टक्के आहे. सध्या कसबा पेठ मतदारसंघात एकुण दोन लाख 90 हजार 683 मतदार आहेत. त्यात एक लाख 44 हजार 127 पुरूष असून, महिला मतदारांची संख्या एक लाख 46 हजार 552 इतकी आहे. तर 2019 च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार अरविंद शिंदे यांना 47, 297 मतं पडली होती. यावेळी मुक्ता टिळक यांच्यात फक्त 28, 196 मताचा फरक होता. त्याचबरोबर 2014 च्या निवडणुकीत कॉंग्रेसचे उमेदवार रोहित टिळक यांना 31, 332 मत तर मनसेकडून उभे राहिलेले रविंद्र धंगेकर यांना 25, 998 मत पडली होती.

---

# महाविकास आघाडीने उमेदवार मागे घेतल्यास, टिळक घराण्यातली व्यक्तीला उमेदवारी देऊ

## » भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन, ब्राह्मणवृंदाच्या दबावपुढे भाजप पक्ष झुकला?

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**चंद्रशेखर बावनकुळे यांनी आम्ही टिळक घराण्यातील व्यक्तीला उमेदवारी देण्यास तयार असल्याचे सांगितले. उद्या तीन वाजेपर्यंत महाविकास आघाडीने कसब्याची निवडणूक बिनविरोध केली तर आम्ही उद्या हेमंत रासने यांना उमेदवारी अर्ज मागे घेऊ. एका वर्षासाठी जनतेवर निवडणूक लादू नये. त्यामुळे काँग्रेसने रवींद्र धंगेकर यांचा उमेदवारी अर्ज मागे घ्यावा.**



आमची कागदपत्र तयार आहेत, फॉर्म तयार आहेत. टिळक परिवाराला आम्ही उमेदवारी द्यायला तयार आहे पण त्यांच्याकडून (महाविकास आघाडी) तसे पाऊल उचलले जावे. कुणाल टिळक, गणेश बिडकर, धीरज घाटे हे सगळेच ताकदवान उमेदवार आहेत. पण एका जागेवरून सर्वजण लढू शकत नाहीत. यापैकी कोणीही उभे राहिले तरी १०० टक्के निवडून येईल. त्यामुळे टिळक परिवार किंवा कोणालाही डावलण्याचा प्रश्नच येत नाही, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

आज दिवसभरातील राजकीय घडामोडींनंतर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेही हे संध्याकाळी टिळक परिवाराचे निवासस्थान असलेल्या केसरीवाडा येथे गेले होते. यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांनीही शैलेश टिळक यांची समजूत काढली. यानंतर बावनकुळे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, टिळक कुटुंबीय आमच्यावर कधीच नाराजी होऊ शकत नाहीत. मुक्ता टिळक आमच्या नेत्या होत्या. टिळक कुटुंबीय नाराज असल्याचा कल्लोळ काही लोक करत आहेत, पण कोणीही नाराज नाही. अनेक मंत्री याठिकाणी येतात, त्यामुळे मीदेखील केसरीवाड्यावर आलो नाही. भाजपमध्ये कोणालाही जाणीवपूर्वक डावलले जात नाही, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

### कसब्यातील ब्राह्मणवृंदाच्या दबावपुढे भाजप पक्ष झुकला?

» गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील राजकारणाचे केंद्रस्थान ठरत असलेल्या कसबा पेठ मतदारसंघात सातत्याने रंजक घडामोडी घडताना दिसत आहे. याठिकाणी भाजपने टिळक घराण्यातील व्यक्तीला उमेदवारी नाकारून हेमंत रासने यांना उमेदवारी दिली होती. त्यामुळे टिळक परिवारासह कसब्यातील ब्राह्मण समाज मोठ्याप्रमाणावर नाराज झाला होता. यानंतर काँग्रेस आणि ठाकरे गटानेही टिळक घराण्याच्या गाठीभेटी घेतल्या होत्या. त्यामुळे कसब्यात भाजपविरोधातील नाराजी वाढली होती. हा धोका वेळीच लक्षात घेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी स्वत: टिळक परिवाराला फोन केला. यावेळी फडणवीसांनी टिळक घराण्याची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. कुणाल टिळक आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात दिवसभरात दोनवेळा फोनवरुन चर्चा झाल्याची माहिती आहे. यावेळी फडणवीस यांनी, 'सांभाळून घ्या, प्रचारात सक्रिय सहभाग घ्या', अशी विनंती टिळक कुटुंबीयांना केली. देवेंद्र फडणवीसांच्या या मनधरणीनंतर शैलेश टिळक आणि कुणाल टिळक भाजप कार्यालयातील बैठकीला हजर झाल्याचे समजते.

# भाजपचे शक्तीप्रदर्शन!

## भाजपच्या उमेदवार अश्विनी जगताप यांचा उमेदवारी अर्ज दाखल

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी भाजप, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय, राष्ट्रीय समाज पक्ष व शिवसंग्राम युतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत आज सोमवारी (ता. ६) उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी जगताप यांनी पिंपळेगुरव ते थेरगाव येथील “ग” क्षेत्रीय कार्यालय, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयापर्यंत पदयात्रा काढली. या पदयात्रेत भाजप कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होती.**



“ग” क्षेत्रीय कार्यालयात जगताप यांचा अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी सचिन ढोले यांच्याकडे सादर केला. यावेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आरोग्य मंत्री तानाजी सावंत, खासदार श्रीरंग बारणे, भाजप शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप आदी उपस्थित होते.

रॅलीमध्ये भाजपसह मित्र पक्षाचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पिंपळेगुरव येथील जनसंपर्क कार्यालयापासून पदयात्रेला सुरूवात झाली.

गावातील भैरवनाथ मंदिरात दर्शन घेतल्यानंतर सृष्टी चौक, सुदर्शननगर, जवळकरनगर, कल्पतरू फेज १, सुदर्शन चौक, स्वराज गार्डनमार्गे पिंपळेसौदागर गावठाण पुढे शंकर मंदिर, रहाटणी चौक, विमल गार्डन, बळीराज गार्डन, कुणाल गार्डन, बापुजी बुवा मंदिर, थेरगाव हॉस्पिटलमार्गे “ग” क्षेत्रीय कार्यालयापर्यंत ही पदयात्रा काढण्यात आली.

### पदयात्रेची क्षणचित्रे

- पदयात्रेत कार्यकर्त्यांची प्रचंड गर्दी
- महिलांचा सहभाग उल्लेखणीय
- बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय आदि मित्र पक्षांच्या कार्यकर्त्यांचा सहभाग
- पदयात्रेत भाजपचे व आरपीआयचे झेंडे लक्ष वेधत होते पदयात्रे मागे दुचाकी व चारचाकी वाहनांचीही रॅली

### विरोधकांनी सकारात्मकता दाखववावी; अश्विनी जगताप



**माझे पती दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी चिंचवड मतदारसंघात केलेले उल्लेखणीय कार्य व पिंपरी चिंचवडचा केलेला सर्वांगीण विकास पाहता माझी निवड बिनविरोध व्हावी या करीता विरोधी पक्षांनी सकारात्कता दाखवावी, असे आवाहन भाजपच्या चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीच्या उमेदवार अश्विनी जगताप यांनी केले आहे. पदयात्रेद्वारे शक्तिप्रदर्शन करून उमेदवारी दाखल केल्यानंतर त्या म्हणाल्या की, मी सहानुभूतीची लाट शोधत नाही. माझी उमेदवारी भरण्यासाठी लोकांनी केलेली गर्दि पाहा. लोकांसाठी नेहमी अथकपणे काम करणार्या माझ्या पतींच्या आदरामुळे सर्व मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. ते जेव्हा प्रचार करायचे तेव्हा मी सतत त्यांच्या सोबत असायचे.**

---

# थरमॅक्स चौकाला अनधिकृत होर्डिंगचा विळखा

## महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाचे दुर्लक्ष

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या वतीने अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्यात येत आहे. परंतु पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत होर्डिंगचे पेव फुटले आहे परंतु महापालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने त्यांचे चांगलेच फावत आहे. अशा अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.**

### टॉवरलाइन की फ्लेक्स लाइन?

**चिखली येथील मोरेवस्ती, म्हेत्रेवस्ती, ताम्हाणे वस्ती परिसरातून टॉवर लाइन गेली आहे. या टॉवरवर धोकादायक पद्धतीने आणि अनधिकृतपणे अनेक राजकीय नेत्यांनी आणि सामाजिक कार्यकर्ते तसेच व्यावसायिकांनी बेकायदा फ्लेक्सबाजी केली आहे. त्यामुळे या परिसरातून येजा करताना नेमके टॉवर लाइन जातो आहे की फ्लेक्सलाइन असा प्रश्न निर्माण होत आहे. परंतु महापालिका प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने परिसराचे विद्रुपीकरण झाले आहे.**

थरमॅक्स चौक ते चिखलीकडे जाणाऱ्या मार्गावर अनेक खासगी संस्था, इन्स्टिट्यूट, राजकीय कार्यकर्ते यांनी फ्लेक्सबाजी केली आहे. परंतु महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयातील अतिक्रमण विभाग केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने अनधिकृत फ्लेक्स आणि होर्डिंग लावणारे जोमात आहेत.

कस्तुरी मार्केट चौक, साने चौक, म्हेत्रे गार्डन, टॉवरलाइन, अष्टविनायक चौक आदी परिसरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत फ्लेक्सबाजी करण्यात आली आहे.

परंतु महापालिकेचा फ क्षेत्रीय कार्यालयाचा अतिक्रमण विरोधी पथक केवळ बघून थंड बसत असल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात फ्लेक्सबाजी करण्यात येत आहे. हे फ्लेक्स धोकादायक पद्धतीने उभारण्यात आलेले आहेत. त्यामुळे



येथून ये-जा करणाऱ्या नागरिकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयांनी आपल्या परिसरातील अनधिकृत फ्लेक्सवर कारवाई करून ज्यांचा फ्लेक्स असेल त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.

## संपादकीय »

# बाजार हाच ईश्वर!

*तुम्ही जर बाजारात असाल, मग ते उद्योगसमूह म्हणून असो, भांडवलदार म्हणून, ब्रोकर, बँकर, सामान्य ट्रेडर किंवा गुंतवणूकदार म्हणून असो; एक मूलभूत नियम समजून घ्यावा : "तुम्ही सर्वात उच्चस्थानी असू शकता, पण बाजार तुमच्याही वर आहे!"*

या आठवड्याचे 'राष्ट्रहिताच्या नजरेतून' गौतम अदानी यांच्याविषयी नाही. त्याऐवजी ते भारतीय भांडवलशाहीविषयी आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील भारतीय भांडवलशाहीसाठी ही कठीण परीक्षा आहे किंवा अधिक नेमके सांगायचे झाले तर १९९१च्या इतिहासानंतरची.

१९९१च्या उन्हाळ्यात बाजारपेठ खुली केल्यानंतर आणि भारतीय बाजाराचे आधुनिकीकरण केल्यानंतर कालानुक्रमे अनेक संकटे भांडवलशाहीवर आली आहेत. यामध्ये हर्षद मेहता, केतन पारेख, फेअरग्रोथ आणि इतरांचा समावेश होतो.

यामुळे भारतीय बाजारासाठी आणि भारतीयांमधील इक्विटी कल्चरसाठी धोका निर्माण झाला. जो नवीन भांडवलशाहीसाठी निर्णायक होता. प्रत्येक घटनेनंतर संसद हादरली. अनेक गुंतवणूकदार दारिद्र्यात ढकलले गेले आणि काही बदमाशांना तुरुंगात पाठवले गेले; पण तेव्हाच्या आणि आताच्या परिस्थितीत काही महत्त्वाचे भेद आहेत.

भारतीय बाजारपेठ आणि अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर एकरूप झाली तेव्हा यातील कोणतेही संकट उद्भवले नाही. ही संकटे आर्थिक किंवा नियामक संस्थांद्वारे केल्या गेलेल्या हस्तक्षेपामुळे झालेली देशांतर्गत बाजारपेठांची होती. हे नवे संकट पूर्णपणे जागतिक बाजारपेठेचे आहे आणि यात माध्यमांत याचे वार्तांकन झाले आहे.


जुन्या संकटांपैकी केतन पारेखचे उदाहरण घेतले, तर हे भारतीय कंपनी भारतातच करत असलेल्या काही उद्योगांसंबंधी होते. नवे संकट हे भारताच्या सर्वात मोठ्या जागतिक भांडवलदाराचे आहे.

आधीची प्रकरणे इथेच उद्भवली व ती भारतीय शोधपत्रकारांकडून उघडकीस आणली. पण, हे प्रकरण परदेशात उघडे पडले, तेही वित्त संस्थेकडून.या लेखातील पाचवा आणि सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, हा सर्व उपद्व्याप ज्यांनी मांडला आहे, ते कुणी कार्यकर्ते नाहीत किंवा कुणी समभागधारकसुद्धा नाहीत. ते या क्षेत्रात फक्त नफा कमावण्यासाठी आलेले आहेत. ते शॉर्ट सेलर्स आहेत. कंपनीचे समभाग खाली येण्यातच त्यांचे हित सामावलेले आहे, ज्यात ते समभागांची शॉर्ट सेलिंग करून गुंतवणूक करतात. तुमच्या समभागांची किंमत वाढते तेव्हाच शेअर बाजारात तुम्हाला पैसे कमावता येतात असे कुणी सांगितले?

# रण का जित झाले नाही ?




विधान परिषदेच्या पाच जागांसाठी झालेल्या निवडणुकांचा निकाल सत्ताधारी पक्षाला झटका देणारे आहेत. पाचपैकी एकाच जागेवर भाजपला समाधान मानावे लागले याचा अर्थ काहीतरी नव्हे बरेच काही चुकते आहे असा होतो. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि प्रधानमंत्री मोदींचे आवडते नेते देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू सहकारी माजी राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील यांचा पराभव भाजपच्या जिव्हारी लागणारा आहे. ज्या जिल्ह्याचे देवेंद्र फडणवीस पालकमंत्री आहेत त्याच परिसरात डॉ.रणजित पाटलांचा पराभव होत असेल तर अमरावती विभागातील भाजपची अव्वल असणारी अन धुरंधर समजली जाणारी निवडणूक यंत्रणा काय करीत होती ? हा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. डॉ. पाटलांच्या पराभवाला घरभेदी कारणीभूत आहेत का ? किंवा स्वतः उमेदवार त्याला कारणीभूत आहेत का याचीही कारणमीमांसा यथावकाश



होईलही मात्र लोकशाहीत लोकांना सर्वकाळ आपण गृहीत धरू शकत नाही असा प्रभावी संदेश यातून मिळाला आहे.

या निवडणुकीत पाचही जिल्ह्यातील भाजपचे आमदार मनापासून प्रचारात भिडले होते असे वाटत नाही कारण डॉ. पाटील विजयी झाल्यास ते पुन्हा मंत्रीपदी विराजमान होतील आणि मागच्या प्रमाणे आपल्याला हात चोळत बसावे लागेल अशी भीती विधानसभेवर निवडून आलेल्या आमदारांमध्ये घालून देण्यात पक्षातीलच काही लोक यशस्वी झाले होते. मुळात डॉ. पाटील काही लोकनेते नाहीत,लोकांना सांभाळून घेणे कार्यकर्ते किंवा विश्वासू सहकारी यांच्यावर जीव ओवाळून टाकणे या भानगडीत ते कधीच पडले नाहीत. पाच वर्ष अत्यंत महत्वाच्या खात्याचे राज्यमंत्री पद सांभाळताना त्यांनी जिल्ह्यातील कुणाचेही काम केले नाही हा आरोप याही निवडणुकीत सतत गाजत राहिला. विकासाची दूरदृष्टी,काम करून घेण्याची धमक आणि जवळची माणसे सांभाळणे यात त्यांना अपयश आल्याचे सांगितले जात असले तरी मुळात तो त्यांचा पिंडच नसल्याचे भाजपच्या लक्षात आले नाही हे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल.

यावेळी पदवीधर निवडणुकीत बदलाचे वारे वाहात असल्याचे सतत जिंकणाऱ्या नेत्याच्या लक्षात येत नसते. मामा,भाच्यांनी कितीही विरोध केला तरी आपल्या विजयावर काहीही परिणाम होत नाही असा गेल्या दोन निवडणुकात अनुभव आल्यामुळे हितचिंतकांच्या सल्ला सहज धुडकावून डॉ. पाटील विजयाच्या आभासावर स्वार झाले होते. इतरांसाठी हा पराभव धक्का असला तरी डॉ. पाटील यांचा " मिठी छुरी " स्वभाव यावेळी चालणार नाही असे भाकीत भाजपमधील अनेकांनी आधीच व्यक्त केले होते. निवडणुकीच्या काही दिवस अगोदर त्यांच्यावर पदवीधरांसाठी काही केले नाही असा आरोप झाला मात्र त्याला कोणतेही समर्पक उत्तर ते देऊ शकले नाहीत कारण पदरात काहीच नव्हते. पाच वर्ष जिल्ह्याचे पालकमंत्री पद सांभाळणाऱ्या डॉ. पाटलांना स्वतःचा इवलासा गटही वाढवता आला नाही किंवा मजबूत करता आला नाही हे वास्तव कुणी नाकारू शकणार नाही.

राजकारणात विजय नेहमी पक्षाचा आणि संघटनेचा आणि पराभव व्यक्तीचा होत असतो या घटनेतही तेच सूत्र लागू होते. हा पराभव भाजपचा म्हणता येणार नाही त्याला डॉ. पाटील यांचे लोकांना जाऊ द्या त्यांच्या गटातील सहकार्यांना आलेले वाईट अनुभव कारणीभूत आहेत हे लक्षात घ्यायला हवे. डॉ. पाटील जिल्ह्याचे पालकमंत्री असताना लालाजी विनोदाने म्हणाले होते की .. साला मै इसकी जगह होता तो ,खिलाफ मे उठणे वाली हर आवाज को दबा देता " परंतु मागच्या पाच वर्षाच्या काळात त्या मार्गाने जाणे तर दूरच ,तसा विचारही पाटील करू शकले नाहीत याचा अर्थ राजकीय डावपेचात ते सतत पिछाडीवर राहण्यात आनंद मानत आले आहेत हे खरे आहे. जुनी पेन्शन योजना , लोकांची नाराजी,ही त्यासोबत आलेली कारणे आहेत ती बाजूला केली तर डॉ. पाटील हेच स्वतःच्या पराभवाला जबाबदार असल्याच्या निष्कर्षावर यावे लागते.

राजकारणात जवळच्या माणसांसाठी प्रसंगी नियम बाजूला सारत मदतीची तयारी ठेवावी लागते. चोवीसतास राजकारण करणाऱ्या नेत्याला काही लोक पोसावे लागतात ,त्यासाठी मनापासून प्रेम,सहकार्य करावे लागते मात्र डॉ. पाटील यांच्या शब्दकोशात त्याची कधी भरच पडली नसल्याची कबुली त्यांचा गटातील विश्वासू सहकारी जेव्हा देतात आणि काही ताजे अनुभव जेव्हा कथन करतात अशावेळी डॉ. पाटील यांचे नव्हे तर पक्षाचे काहीतरी चुकले असावे असे वाटते.

# जिंदगी देने वाले सुन मेरा दुनिया से दिल भर गया

**एखादे गीत किंवा गझल ७० वर्षानंतर सुपरहिट होईल ही अशक्यप्राय वाटणारी गोष्ट खरोखर घडली आहे. जुन्या सिनेमातील काही गाणी अशी आहेत की त्यांचे शब्द कानावर पडताच हृदयाला चिरून जातात. त्याकाळात कदाचित उडत्या चालीवर ती गायली गेली नसतील परंतु**

नव्या पिढीतील एखादा गायक,संगीतकार ते ऐकतो आणि त्याला शब्द अस्वस्थ करून जातात. प्रतिभावान व्यक्तीच्या डोक्यात एखादा विषय गेला की त्याला चैन पडत नाही. आजवर असे प्रयोग अनेक झाले आहेत अनेक जुन्या सिनेमातील गाणे नव्या सिनेमात घेतली गेली , त्यातील काहींची भट्टी जमली तर काहींचे प्रयोग फसले आहेत. अलीकडे इंटरनेटची अमर्याद संधी प्राप्त झाल्यावर आपल्या विराट देशात कानाकोपऱ्यात काय प्रयोग केले जातात ते सहज बघण्याची सोय झाली यातून एकापेक्षा एक कलावंत आपल्याला गवसत आहेत.

राजस्थान मधील जैसलमेर हे असेच कलेच्या क्षेत्रातील हिरे,मानकांचे शहर आहे. युट्युबवर जे असंख्य लोकगीते तहलका उडवत आहेत त्यातील पन्नास टक्के जागा या राजस्थानी लोकगीत गायकांनी व्यापून टाकला आहे. शाका चांधन हा गायक असाच भन्नाट प्रयोग करणारा लोकगीत गायक आहे. युट्युबवर तो असंख्य गाणी ऐकत असतो , त्यापैकी मूठभर क्लिक होतात. जी गाणी त्याचे भावविश्व गांगरून सोडतात



,बेचैन करतात ,अगदी डोक्यात जातात त्याचे शब्द तो समजून घेतो आणि मग पुढचे काही महिने झपाटल्यासारखे वागतो. कधी कधी आपलेही असे होते,कुठलेतरी गाणे,गझल थेट काळजाचा ठाव घेते आणि मग पुढचे काही दिवस तिचा आपल्यावर ताबा असतो. अनेकदा घरातले लोक संशयाने बघत असतात,बरा आहेस ना बाबा ? अशीही विचारणा होते ,तो काळ तात्पुरता का असेना आपल्यासाठी झपाटलेला काळ असतो. सहा महिन्यापूर्वी शाका चांधन या गायकाला सुद्धा एका मंद स्वरात असलेल्या गझलेने असेच झपाटून टाकले होते. १९५३ साली प्रदर्शित झालेल्या " दिल ए नादान " या सिनेमात तलत मेहमूद यांनी हे गीत गायले होते. शकील बदायुनी यांनी लिहिलेल्या या गीताचे शब्द होते " जिंदगी देने वाले सुन,'तेरी दुनिया से दिल भर गया !" अत्यंत थंड आणि आताच्या काळात कुणालाही सहज झोप येऊ शकेल असे हे गीत वाटत असले तरी शकील बदायुनी यांच्या शब्दात असलेली ताकद त्यांनी कुठेही फिकी पडू दिली नाही हे जाणवते. प्राण कानात आणून एकेक शब्द ऐकला की अंग शहारून जाते. अंगावर काटे येतात,डोळ्यातून आसवे पाझरायला सुरुवात होते. शाका चांधन या गायकावर सुद्धा या गीताने असेच गारुड केले आणि त्यानंतर गाण्यातील शब्द त्याच्या मनात रुंजी घालत राहिले ,कोणताही जाहीर कार्यक्रम आटोपला की रात्री बेरात्री शकील बदायुनीचे शब्द मेंदूचा ताबा घेऊन त्याला गुणगुणायला भाग पाडत होते. बेचैनी वाढत गेल्यावर एक दिवस पहाटे शाकाने हार्मोनियम काढून स्वतःला योग्य वाटेल त्या चालीवर तलत मेहमूद यांची ही गझल गायला सुरुवात केली.तासाभरात त्याच्या भोवती सारे घर गोळा झाले, हृदयाचा ठाव घेणारे शब्द अन चिरून जाणारी शब्दफेक,गायकीतील चढउतार ऐकून सगळे अवाक झाले होत. गीत ७० वर्ष जुने असले तरी जणू त्याचा आजच जन्म झाला असावा एवढे ते कोरे करकरीत वाटत होते.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शेतकरी आक्रमक!

## प्रभात दुध कंपनीने शेतकऱ्यांची लुट थांबविण्याची मागणी

। मुंबई। महाईन्यूज ।

**"प्रभात (लॅक्टीलिस) दुध कंपनी विविध अटी लादून दुध उत्पादक शेतकऱ्यांची लुट करत आहे", असा गंभीर आरोप किसान सभा व दुध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने केला आहे. तसेच कंपनीने शेतकऱ्यांची ही लुट थांबवावी आणि शेतकऱ्यांचे थकीत देयक तातडीने आदा करावेत, अशी मागणी केली.**



दुध उत्पादक शेतकरी संघर्ष समिती म्हणाली,"शेतकऱ्यांनी वर्षातील ७० टक्के दुध कंपनीला घातले तरच दिवाळीला लाभांश मिळेल अशी अट टाकून शेतकऱ्यांना एकप्रकारे गुलाम बनविले आहे. परवडेल तिकडे दुध घालण्याचे दुध उत्पादकांचे स्वातंत्र्य यामुळे बाधित झाले आहे. अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांचे या अटीमुळे कोट्यावधी रुपये कंपनीकडे पडून आहेत."

"कंपनीने ही अट तातडीने रद्द करावी व देय लाभांश शेतकऱ्यांना अदा करावा अशी मागणी संघटनेने केली आहे. प्रभात (लॅक्टीलिस) प्रमाणे सर्वच कंपन्यांनी ७० टक्के दुधाची अट रद्द करावी अशी दुध उत्पादकांची मागणी आहे. आपल्या या दुध उत्पादकांनी २५ जानेवारीला केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आज तहसीलदार थेटे यांनी बोलविलेल्या बैठकीत याबाबत संघटन व कंपनीचे अधिकारी यांच्यात चर्चा झाली," अशी माहिती समितीने दिली. यावेळी शेतकरी आक्रमक झालेले पाहायला मिळाले.

समिती पुढे म्हणाली, "दुध उत्पादक शेतकऱ्यांचा ३१ मार्च २०२१ ते ३० सप्टेंबर २०२२ या कालावधीचा १८ महिन्यांचा सविस्तर हिशोब प्रत्येक शेतकऱ्याला लेखी द्या. हिशोबाची शिल्लक रक्कम शेतकऱ्यांना त्वरित अदा करा. ऑक्टोबर २०२१ मधील आंदोलनात दुध कंपनीचे अधिकारी मराठे यांनी शेतकऱ्यांना अमृतसागर दूध संघाप्रमाणे लाभांश देण्यात येईल असे जाहीर केल्यामुळे शेतकयांनी प्रभातला (लॅक्टीलिस) दुध घातले. कालांतराने कंपनीने डिसेंबर २०२१ मध्ये ७० टक्के दुध घातले तरच लाभांश मिळेल ही अट टाकली."

"अमृतसागर संघाप्रमाणे किमान २ रुपये लाभांश मिळणार म्हणून शेतकऱ्यांनी तरीही कंपनीला दूध घालणे सुरूच ठेवले. नंतर फेब्रुवारी २०१२ मध्ये शब्द फिरवत कंपनीने १ रुपया लाभांशाची घोषणा केली. घोषणा होईपर्यंत शेतकऱ्यांनी ४ महीने दुध घातले असल्याने ७० टक्के अटीमुळे या ४ महिन्याचे रिबीट बुडेल या भीतीमुळे शेतकऱ्यांना पुढे ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत दुध घालावे लागले," अशी माहिती शेतकऱ्यांनी दिली.

"कंपनीने असे करून हेतुतः शेतकऱ्यांना जाळ्यात अडकवून त्यांची लूट केली आहे. ही लूट परत करत ३१ मार्च २०२१ ते ३० सप्टेंबर २०२२ या कालावधीचा २ रुपये प्रमाणे लाभांश द्या. इंडीफोस मशीनचे सेटिंग बदलता येत असल्याने सेटिंग बदलून शेतकऱ्यांची लुट होते. वजन व गुणवत्ता मापनामध्येही फेरफार करून लुट होते.

### शेतकऱ्यांना जाळ्यात अडकवून त्यांची लूट

"अमृतसागर संघाप्रमाणे किमान २ रुपये लाभांश मिळणार म्हणून शेतकऱ्यांनी तरीही कंपनीला दूध घालणे सुरूच ठेवले. नंतर फेब्रुवारी २०१२ मध्ये शब्द फिरवत कंपनीने १ रुपया लाभांशाची घोषणा केली. घोषणा होईपर्यंत शेतकऱ्यांनी ४ महीने दुध घातले असल्याने ७० टक्के अटीमुळे या ४ महिन्याचे रिबीट बुडेल या भीतीमुळे शेतकऱ्यांना पुढे ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत दुध घालावे लागले," अशी माहिती शेतकऱ्यांनी दिली. "कंपनीने असे करून हेतुतः शेतकऱ्यांना जाळ्यात अडकवून त्यांची लूट केली आहे.

# हे महाराष्ट्राचे सरकार आहे की दिल्लीश्वरांचे सरकार!

## आदित्य ठाकरेंचा शिंदे गटाला टोला

।नाशिक । महाईन्यूज ।

**राज्य सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार होणार नाही, या सरकारमध्ये सर्व आमदारांना केवळ गाजर दिले आहे, तुला मंत्री करतो, तुला मंत्री करणारच असं सांगितलं जात आहे. हे महाराष्ट्राचे सरकार आहे की दिल्लीश्वरांचे सरकार हेच कळत नाही, असा टोला युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी शिंदे गटाला लगावला आहे..**

युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या शिवसंवाद यात्रेचा सातवा टप्पा आजपासून सुरू झालेला आहे चार दिवसांची ही शिव संवाद यात्रा असणारे नाशिक औरंगाबाद, जालना आणि बीड या जिल्ह्यांमधून ही शिवसंवाद यात्रा जाणार आहे. या आधी देखील आदित्य ठाकरे यांनी शिव संवाद यात्रा काढत राज्यातल्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये जाऊन पक्ष बांधणी केली होती. आता शिवसंवाद' यात्रेचा दुसरा टप्पात नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी



(IGATPURI) मतदारसंघातील मुंढेगाव येथून संवाद कार्यक्रमास सुरुवात झाली, यावेळी आदित्य ठाकरे बोलत होते. यावेळी आदित्य ठाकरे म्हणाले कि, शिवसंवाद दौऱ्यातही अनेक ग्रामपंचायतींना भेटणार आहे. या माध्यमातून लोकांच्या समस्या जवळून अनुभवयाला मिळतात. गद्दार गँगने सरकार पाडल्यानंतर गावागावात जाऊन लोकांशी बोलत आहे. 50 लोक असले तरी मी बोलणार असून तिकडे 50 कोटीचा खर्च झाला पण त्यांच्याकडे 50 लोक येत नाही. हे सरकार जास्त दिवस टिकत नाही.

### लोकांची पिण्याच्या पाण्यासाठी वणवण

यावेळी आदित्य ठाकरे म्हणाले कि, शिवसंवाद दौऱ्यातही अनेक ग्रामपंचायतींना भेटणार आहे. या माध्यमातून लोकांच्या समस्या जवळून अनुभवयाला मिळतात. गद्दार गँगने सरकार पाडल्यानंतर गावागावात जाऊन लोकांशी बोलत आहे. 50 लोक असले तरी मी बोलणार असून तिकडे 50 कोटीचा खर्च झाला पण त्यांच्याकडे 50 लोक येत नाही. हे सरकार जास्त दिवस टिकत नाही. एका माणसाच्या राक्षसी महत्वकांक्षेने ही वेळ आली आहे. गद्दारच सरकार होर्डिंग्जवाल्यांची कर्ज मुक्ती करत आहे, बाकी कुणाची नाही. हे सरकार इकडेतिकडे फिरत आहे, मात्र लोकांना काही मिळत नाही. अशी अनेक गावं आहे, जिथे रस्ते नाही डोल्या मधून दळणवळण नाही. आजूबाजूला समृध्दी आली, पण गावात पाणी नाही. मुंबई महापालिकेसाठी पाण्यासाठी आम्ही इथे धरण बांधले. पण आज याच लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याची खंत आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केली.

# नंदुरबारातील अक्कलकुवा कालिका मातेच्या यात्रेत बैल बाजार फुलला

## खरेदी-विक्रीतून कोट्यवधींची उलाढाल



।नंदुरबार ।महाईन्यूज ।

गुजरात-मध्यप्रदेशचा सीमावर्ती भाग आणि उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठा बैल बाजार अशी ख्याती असलेल्या अक्कलकुवा येथील बाजार गर्दीने फुलल्याचं दिसून येतंय. अक्कलकुवा येथील कालिका मातेच्या यात्रा उत्सवाच्या निमित्ताने हा बाजार भरतो. यंदा दोन वर्षाच्या खंडानंतर भरणाऱ्या बैल बाजारात मोठ्या प्रमाणात बैल विक्रीसाठी दाखल झाले असून या खिल्लार ,नागोरी ,गावठी, जातीच्या मोठ्या प्रमाणात आवक होत असते. यंदा बैल बाजारामध्ये मोठा उत्साह पाहावयास मिळत आहे. बैलांची मोठ्या प्रमाणात आवक झाली असून खरेदी-विक्रीतून कोट्यावधी रुपयांची उलाढाल होत असते. शेतकऱ्यांनी आणि व्यापारी या ठिकाणी बैल खरेदीसाठी आणि विक्रीसाठी दाखल झाले आहेत.

### बैल बाजारातून होते कोट्यवधी रुपयांची उलाढाल

अक्कलकुवा होणाऱ्या बैलबाजारासाठी दोन हजारापेक्षा अधिक बैलजोड्या येत असतात. या ठिकाणी लाकडी आणि लोखंडी बैलगाड्याही विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत. अक्कलकुवा या ठिकाणी होणाऱ्या बैल बाजारात कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असते. कोरोनामुळे गेल्या दोन वर्षापासून बाजार बंद असल्याने यावर्षी बैल बाजारात प्रचंड तेजी पाहण्यास मिळत आहे.

# टर्कीमध्ये भीषण भूकंप!

## तीन भूकंपांमुळे टर्कीमध्ये मोठी जीवितहानी, आतापर्यंत 2500 जणांचा मृत्यू





**। सिरिया। महाईन्यूज ।**

**मध्य टर्की तसेच उत्तर-पश्चिम सिरियामध्ये झालेल्या तीन भूकंपांमुळे येथे मोठी जीवितहानी झाली आहे. भूकंपामध्ये आतापर्यंत २५०० जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत अद्याप शेकडो लोक ढासळलेल्या इमारतींच्या ढिगाऱ्याखाली दबलेले आहेत. याच कारणामुळे मृतांसह जखमींचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.**

टर्कीमधील आपत्कालीन विभागाने या भूकंपांमध्ये झालेल्या जीवितहानीबाबत अधिक माहिती दिली आहे. या माहितीनुसार टर्कीमध्ये झालेल्या ७.८ रिश्टर स्केलच्या भूकंपामुळे आतापर्यंत १४९८ जणांचा मृत्यू झाला आहे. तर सिरियामध्ये आतापर्यंत ८१० लोकांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे मृतांचा आकडा आता २५०० वर पोहोचला आहे.

### इतिहासातील सर्वांत मोठा भूकंप

सिरियामध्ये सोमवारी (६ फेब्रुवारी) पहाटे ७.८ रिश्टर स्केल तीव्रतेचा पहिला भूकंप झाला. त्यानंतर काही तासांच्या अंतरांवर आणखी दोन मोठे भूकंपाचे धक्के बसले. या एकूण तीन भूकंपांमुळे टर्की देशातील महत्त्वाचे प्रदेश भुईसपाट झाले आहेत. टर्कीमधील राष्ट्रीय भूकंप केंद्राचे प्रमुख रायद अहमद यांनी या दुर्घटनेला इतिहासातील सर्वांत मोठा आणि भीषण भूकंप असल्याचे म्हटले आहे. भूकंपाच्या घटना रात्री घडत आहेत. त्यामुळे बचावकार्य करणे कठीण होतेय. भूकंपाच्या या घटनेवर टर्कीचे राष्ट्राध्यक्ष तय्यीप एर्दोगान यांनी प्रतिक्रिया दिली आहे. "बचावकार्यासाठी प्रत्येकजण पूर्ण क्षमतेने प्रयत्न केले जात आहेत. मात्र सध्या हिवाळा आहे. बाहेर खूप थंडी आहे. त्यात भूकंपाच्या घटना रात्री घडत आहे.

### दुसऱ्या भूकंपाची तीव्रता 7.6 रिश्टर स्केल

**टर्की पहिल्या भूकंपाच्या धक्क्यातून सावरत असताना काही तासांनंतर येथे लगेच दुसरा भूकंपाचा धक्का जाणवला. या भूकंपाची तीव्रता ७.६ रिश्टर स्केल होती. या भूकंपामध्येही अनेक इमारती ढासळल्याचे म्हटले जात आहे. उपलब्ध व्हिडीओज आणि फोटोंनुसार टर्कीमध्ये आतापर्यंत शेकडो लोकांचा मृत्यू झाला असून कोट्यवधींचे आर्थिक नुकसान झाले आहे.**

### भारत टर्कीच्या मदतीला धावला

**दरम्यान, भूकंपाच्या घटनेमुळे टर्कीमधील जनजीवन विस्कळीत झाले आहे. टर्की सरकारकडून अन्य देशांनी आम्हाला संकटकाळात मदत करावी, असे आवाहन केले आहे. अशा कठीण काळात भारत टर्कीच्या मदतीला धावला आहे. भारताकडून तेथे बचावपथकाच्या दोन टीम पाठवण्यात आल्या आहेत. सोबतच वैद्यकीय मदतही पाठवण्यात आली आहे.**

# दिल्ली महापौरांची निवडणूक तिसऱ्यांदा रखडली!

## गदारोळामुळे कामकाज स्थगित

**।नवी दिल्ली। महाईन्यूज ।**

दिल्ली महानगरपालिकेच्या ) महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक आज, सोमवारी तिसऱ्यांदाही होऊ शकली नाही. सभागृहाचे कामकाज सुरू होताच गदारोळ झाला. त्यामुळे पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाचे कामकाज आधी 10 मिनिटांसाठी तहकूब केले. मात्र, गदारोळ सुरूच राहिल्याने त्यांनी सभागृह अनिश्चित काळासाठी तहकूब केले. अशाप्रकारे पुन्हा एकदा दिल्ली महापालिकेच्या महापौरपदाची निवडणूक होऊ शकली नाही. त्यामुळे आम आदमी पार्टीने सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे. आज सभागृहाची बैठक सुरू होण्यापूर्वीच आप आणि भाजपमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू झाल्या होत्या. पीठासीन अधिकाऱ्याने सभागृहाचे कामकाज तहकूब करावे, यासाठी भाजपाने आपल्या नगरसेवकांना सभागृहात गोंधळ घालण्यास सांगितले असल्याचा आरोप आम आदमी पार्टीने केला. तर दुसरीकडे, भाजपाने पत्रकार परिषद घेऊन आम आदमी पार्टीवर आपले नगरसेवक खरेदी करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. महापौर, उपमहापौर आणि स्थायी समिती सदस्यांना मतदान करण्यासाठी आम आदमी पार्टीच्या नेत्यांनी आमच्या 10 नगरसेवकांशी संपर्क साधला आणि त्यांना कोट्यवधी रुपयांची ऑफर देण्यात आली, असा दावा भाजपाने केला. भाजपच्या नेत्यांनी आपले सर्व 10 नगरसेवक प्रसार माध्यमांसमोर हजर केले. सभागृहाचे कामकाज तहकूब झाल्यानंतर दोन्ही पक्ष एकमेकांवर आरोप करत आहेत. तर दुसरीकडे आम आदमी पार्टीने महापौर निवडीबाबत सर्वोच्च न्यायालयात जाण्याची तयारी केली आहे. कालबद्ध पद्धतीने महापौरपदाची निवडणूक घ्यावी आणि नामनिर्देशित सदस्यांना मतदानाची परवानगी देऊ नये, अशी मागणी आप करणार आहे.

### नामनिर्देशित सदस्यांना मतदान करण्याला आपचा आक्षेप

**नायब राज्यपालांनी नामनिर्देशित केलेले सदस्यही महापौर आणि उपमहापौरपदाच्या निवडणुकीत मतदान करू शकतात, असे सभागृहाचे कामकाज सुरू झाले तेव्हा पीठासीन अधिकाऱ्यांनी सांगितले. हे सदस्य भाजपाच्या पारड्यात मते टाकतील, असा दावा करत आपच्या नगरसेवकांनी विरोध सुरू केला आणि सभागृहात गोंधळ सुरू झाला. आपच्या ज्या दोन नेत्यांविरोधात खटला सुरू आहे, त्यांना मतदान करू देऊ नये, अशी मागणी भाजपा नगरसेवकांनी केली. त्यावरून भाजपा नगरसेवकांनीही गदारोळ केला. अशा प्रकारे सभागृहात शांतता प्रस्थापित होत नसल्याचे पाहून पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाचे कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केले.**



# “माझी बायको होशील तर तुला... ” निर्मात्याने प्रसिद्ध अभिनेत्रीला दिलेली ऑफर

टीव्ही आणि चित्रपट उद्योगात गॉडफादर नसेल तर काम मिळणं खूप कठीण असतं. अनेक कलाकारांना काम मिळवण्यासाठी खूप संघर्ष करावा लागतो. तर, काहींना कास्टिंग काऊचचा सामनाही करावा लागतो. टीव्हीवरील एका अभिनेत्रीने काम मिळवण्यासाठी तिला देण्यात आलेल्या एका ऑफरचा खुलासा केला आहे.‘शेरदिल शेरगिल’ या मालिकेतून टीव्ही इंडस्ट्रीत पदार्पण करणाऱ्या आयशा कपूरने तिचा धक्कादायक अनुभव सांगितला. आयशा कपूर आता अनेक वेब सीरिज आणि टीव्ही शोचा भाग आहे, पण जेव्हा तिने काम करायला सुरुवात केली होती, तेव्हा स्वत:ला कास्टिंग डायरेक्टर म्हणवून घ्यायचे आणि मी त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवायचे. मी मोठ्या हिमतीने खोट्या लोकांपासून सुटका करून घेतली होती,” असं आयशाने सांगितलं होतं.

आयशाने एकदा मीडियाशी बोलताना सांगितलं होतं की, “एकदा मला एका मोठ्या प्रोजेक्टची ऑफर आली होती, मला त्यात मुख्य अभिनेत्री म्हणून कास्ट करण्यात आले होते, पण शोच्या निर्मात्याने माझ्यासमोर एक अट ठेवली होती. जर मी त्याच्याशी लग्न केले तरच मला ही मुख्य भूमिका मिळेल, असे तो म्हणाला. इतकंच नाही तर माझ्याशी लग्न केलंस तर तुला मी मुंबईत लक्झरी लाइफ आणि सर्व सुखसोई पुरवेन,असंही त्याने सांगितलं होतं. कष्टाशिवाय प्रसिद्धी आणि पैसा मिळेल, फक्त बदल्यात त्याच्याशी लग्न करावे लागेल, असं तो म्हणाला होता. मी त्याला नाही म्हटलं होतं”.



तिला खूप संघर्ष करावा लागला होता. “मला नेहमीच अभिनेत्री व्हायचं होतं, पण माझा प्रवास सोपा नव्हता. सुरुवातीला मी लोकांना भेटायचे तेव्हा ते मला चुकीचे मार्गदर्शन करायचे. कोणीही

# मायरा वायकुळलाही पडली ‘पठाण’ची भुरळ




बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खानच्या ‘पठाण’ चित्रपटाला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. तब्बल ४ वर्षांनी मोठ्या पडद्यावर परतलेल्या शाहरुखला पाहण्यासाठी चाहते तुफान गर्दी करत आहेत. यंदाच्या वर्षी प्रदर्शित झालेला हा बिग बजेट व तगडी स्टारकास्ट असलेला चित्रपट प्रेक्षकांना आकर्षित करण्यात यशस्वी ठरला आहे. चित्रपटांप्रमाणेच यातील गाणीदेखील सुपरहिट ठरली आहेत. ‘झुमे जो पठाण’ हे गाणे चांगलेच गाजत आहे. यावर अनेकांनी रिल्स बनवली आहेत. आता प्रेक्षकांची लाडकी मायरादेखील यावर थिरकली आहे.

‘माझी तुझी रेशीमगाठ’ मालिकेतून मायराने छोट्या पडद्यावर पदार्पण केलं आणि सर्वांची शाबासकी मिळवली. तिचा निरागसपणा प्रेक्षकांना भावला. तिचे आई-वडील सोशल मीडियावरून मायराबद्दल अनेक गोष्टी चाहत्यांची शेअर करत असतात. नुकताच तिने ‘पठाण’ चित्रपटातील ‘झुमे जो पठाण’ या गाण्यावर धमाकेदार डान्स केला आहे. मायराचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर सध्या खूप व्हायरल होत आहे. नेटकऱ्यांनीदेखील यावर कमेंट्स केल्या आहेत.

# फिल्मी बॅकग्राऊंड नाही तरीही करण जोहरने सिद्धार्थला कसा दिला ब्रेक ?

सिद्धार्थ मल्होत्रा हा बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता आहे. सिद्धार्थ मल्होत्रा 7 फेब्रुवारी म्हणजेच उद्या कियारा अडवाणीसोबत जैसलमेरमध्ये लग्न करणार आहे. दोघांचे लग्नाआधीचे फंक्शन्स सुरू झाले आहेत. अशात सर्वांच्या नजरा शेरशाह जोडीच्या लग्नाच्या अपडेट्सवर खिळल्या आहेत. सिद्धार्थ मल्होत्राने बॉलिवूडमध्ये येण्यापूर्वी खूप संघर्ष केला आहे. सिद्धार्थने प्राथमिक शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण झाल्यांनतर मॉडेलिंगच्या जगात प्रवेश केला. आपला वैयक्तिक खर्च भागवण्यासाठी सिद्धार्थने हा व्यवसाय निवडला होता. सिद्धार्थने या क्षेत्रात खूप नाव कमावले. यानंतर त्याने फिल्मी दुनियेत पाऊल ठेवण्याचा



# 'ही' प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट कियारा अडवाणीला देणार 'ब्रायडल लूक'

बॉलिवूडचे लोकप्रिय कपल सिद्धार्थ मल्होत्रा आणि कियारा अडवाणी जैसलमेरमध्ये लग्नबंधनात अडकणार आहेत. दोघांचे लग्नाआधीचे फंक्शन्स सुरू झाले आहेत. अशात सर्वांच्या नजरा शेरशाह जोडीच्या लग्नाच्या अपडेट्सवर खिळल्या आहेत. त्याचवेळी, या सगळ्यामध्ये, कियाराला नववधूचा लूक कोण देणार हे जाणून घेण्याचीही सर्वांना उत्सुकता आहे. म्हणजेच तिचा मेकअप आर्टिस्ट कोण असेल.

मेकअप आर्टिस्ट स्वर्णलेखा गुप्ता कियाराला ब्राइडल लुक देईल. शनिवारी संध्याकाळी गुप्ता इतर मेकअप आर्टिस्टसह जैसलमेरला रवाना झाली होती. कियाराची आई आणि तिच्या कुटुंबातील इतर सदस्यांसाठी मेकअप आर्टिस्टची आणखी एक टीम जैसलमेरला पोहोचली आहे. कियाराचा हेअरस्टायलिस्ट अमित ठाकूरही त्याच्या टीमसोबत जैसलमेरला पोहोचला आहे.

स्वर्णलेखा गुप्ता हे बॉलिवूडमधील प्रसिद्ध नाव आहे. तिने चित्रपटांमध्ये कियाराचा मेकअपही केला आहे. कबीर सिंग या सुपर-डुपर हिट चित्रपटातील कियाराचा 'नो मेकअप' लूक स्वर्णलेखाने केला होता. यासोबतच तिने अनेक टीव्ही जाहिराती आणि चित्रपटांमध्ये कियाराला आपला लूक दिला आहे.

स्वर्णलेखाने माधुरी दीक्षित, करीना कपूर खान, करिश्मा कपूर, बुना अब्दुल्ला, आलिया भट्ट, परिणीती चोप्रा, आदिती राव हैदरी यांसारख्या अनेक बॉलिवूड अभिनेत्रींसोबतही काम केले आहे.



# आघाडीच्या फळीवर मदार!

## महिला ट्वेन्टी-20 विश्वचषकात भारतीय संघाच्या चांगल्या कामगिरीची मितालीला आशा

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाला जेतेपदाची संधी आहे. मात्र, त्यासाठी भारताच्या आघाडीच्या फळीतील फलंदाजांनी दमदार कामगिरी करणेचे गरजेचे आहे, असे मत माजी कर्णधार मिताली राजने व्यक्त केले.**

दक्षिण आफ्रिकेत शुक्रवारपासून (१० फेब्रुवारी) महिलांच्या ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला सुरुवात होणार असून भारताची सलामीची लढत पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध रविवारी रंगणार आहे. या स्पर्धेतील भारताचे यश आघाडीच्या फलंदाजांसह गोलंदाजांवरही अवलंबून असेल, असे मितालीला वाटते. भारताच्या गोलंदाजांनी आपल्या कामगिरीत सुधारणा करणे आवश्यक आहे, असे मिताली म्हणाली.'ट्वेन्टी-२० विश्वचषकात भारताची मदार आघाडीच्या फळीतील फलंदाजांवर असेल. स्मृती मानधना लयीत असून सामना एकहाती जिंकवण्याची तिच्यात क्षमता आहे. हरमनप्रीत कौरनेही अलीकडच्या काळात चांगली कामगिरी केली आहे. मात्र, या स्पर्धेत मोठे यश मिळवण्यासाठी भारताला ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांसारख्या संघांना नमवावे लागेल. त्याकरिता अन्य फलंदाजांचे योगदानही महत्त्वाचे ठरेल," असे मितालीने 'आयसीसी'च्या संकेतस्थळावरील आपल्या स्तंभलेखात लिहिले.

यजमान दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिज यांच्याविरुद्ध नुकत्याच झालेल्या ट्वेन्टी-२० तिरंगी मालिकेत भारतीय महिला संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. या मालिकेसह ट्वेन्टी-२० विश्वचषकासाठी निवडण्यात आलेल्या भारतीय संघात शिखा पांडेचा अपवाद वगळता अनुभवी गोलंदाजांची कमतरता आहे. "विश्वचषकात भारतीय गोलंदाजांची कसोटी लागेल आणि त्यांनी आपल्या कामगिरीत सुधारणा करणे गरजेचे आहे," असे मिताली म्हणाली.

दक्षिण आफ्रिकेत नुकत्याच झालेल्या पहिल्या युवा महिला (१९ वर्षांखालील) विश्वचषकात भारतीय संघ विजेता ठरला होता. सलामीवीर शफाली वर्माने या संघाचे नेतृत्व केले होते, तर यष्टिरक्षक रिचा घोषचाही संघात समावेश होता. या स्पर्धेतील अनुभवाचा शफाली आणि रिचाला ट्वेन्टी-२० विश्वचषकात फायदा होईल अशी मितालीला आशा आहे.



### ऑस्ट्रेलिया प्रमुख दावेदार

**फलंदाजांच्या मजबूत फळीमुळे ऑस्ट्रेलियाचा संघ महिला ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या जेतेपदासाठी प्रमुख दावेदार असल्याचे मत मितालीने व्यक्त केले. "ऑस्ट्रेलियाचा संघ जेतेपदासाठी प्रमुख दावेदार आहे, यावर सर्वांचेच एकमत होईल. मला चुरशीचे सामने होतील अशी अपेक्षा आहे. ऑस्ट्रेलियाची फलंदाजीची फळी मजबूत आहे. त्यांच्या तळाच्या फलंदाजही महत्त्वपूर्ण योगदान देतात. त्यांना पराभूत करणे नेहमीच अवघड असते. एकच भूमिका निभावण्यासाठी ऑस्ट्रेलियाकडे अनेक फलंदाज आहेत. त्यामुळे एकीला अपयश आल्यास दुसरी फलंदाज संघाला सावरून घेते. मात्र, बाद फेरीत भारत आणि इंग्लंड हे संघ ऑस्ट्रेलियाला टक्कर देतील अशी मला आशा आहे," असे मितालीने नमूद केले.**

### 'डब्ल्यूपीएल'मुळे महिला क्रिकेटला चालना

**महिलांच्या प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटचे पहिले पर्व या वर्षी खेळवले जाणार असून या स्पर्धेमुळे महिला क्रिकेटला अधिक चालना मिळेल याची मितालीला खात्री आहे. "महिला क्रिकेटमध्ये आता सतत बदल होत आहेत. ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये पूर्वी १४० धावाही पुरेशा होत्या. मात्र, आता १६०-१८० धावांचे आव्हानही पार केले जाते. त्यामुळे सामने अधिक चुरशीचे होत आहेत. जगभरात विविध ट्वेन्टी-२० लीग सुरू झाल्याने हा बदल घडून आला आहे. आता भारतात लवकरच महिलांच्या प्रीमियर लीगला सुरुवात होणार आहे. या स्पर्धेमुळे भारतातील स्थानिक खेळाडूंना आंतरराष्ट्रीय खेळाडूंसोबत खेळण्याची, त्यांच्याकडून शिकण्याची संधी मिळेल. यासह त्यांना आर्थिक स्थैर्यही मिळेल," असे मिताली म्हणाली.**

---

# सुवर्णपदक घेताना हिजाब अनिवार्य!

## इराणच्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या शटलर बाबतीत घडला विचित्र प्रकार

।इराण।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

कर्नाटकच्या तान्या हेमंतने रविवारी तेहरान येथे इराण फजर आंतरराष्ट्रीय चॅलेंज बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले, परंतु तिला सुवर्णपदक मिळवण्यापूर्वी हिजाब घालावा लागला. हिजाब घातल्याशिवाय सुवर्णपदक देता येणार नसल्याचे सांगितल्याने तिला देखील ते मान्य करावे लागले. प्रकाश पदुकोण बॅडमिंटन अकादमीत प्रशिक्षण घेत असलेल्या १९ वर्षीय द्वितीय मानांकित तान्याने ३० मिनिटांत गतविजेती आणि देशबांधव तस्नीम मीरला गारद केले. पहिल्या गेममध्ये या बंगळूरच्या मुलीने २१-७,२१-११ असा विजय नोंदवला.

कार्यक्रमाच्या ठरलेल्या नियमानुसार आयोजकांनी तान्याला पदकप्रदान समारंभात हिजाब घालण्यास सांगितले. तस्नीमने हा मुकुट जिंकल्यावर गेल्या वर्षीही ही प्रथा प्रचलित होती. बॅडमिंटनच्या सूत्रांनी सांगितल्यानुसार आयोजकांनी हे स्पष्ट केले आहे की जरी टूर्नामेंट प्रॉस्पेक्टसमध्ये पोडियम ड्रेस कोडचा उल्लेख नाही तरी महिला पदक विजेत्यांसाठी हिसाब अनिवार्य आहे. सूत्रांच्या मते, "प्रॉस्पेक्टस बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनच्या स्पर्धा नियमांमधील कपड्याच्या नियमांबद्दल बोलले होते, जे बहुतेक जगभरातील स्पर्धांमध्ये सामान्य आहे. तेहरानमध्ये महिलांनी बाहेर पडताना हिजाब अनिवार्य आहे हे आम्हाला माहीत होते, परंतु स्पर्धेदरम्यान त्यांच्या वापराबाबत कोणताही विशेष उल्लेख नव्हता."महिला शटलर्सना त्यांच्या सामन्यांदरम्यान लेगिंग किंवा हिजाब अशा कोणत्याही निर्बंधांचा सामना करावा लागला नाही. परंतु कोणत्याही पुरुष प्रेक्षकांना त्यांना खेळताना पाहण्याची परवानगी नव्हती. प्रवेशद्वारावर 'पुरुषांना परवानगी नाही' असे लिहिलेले स्टिकर, महिला खेळाडूचे प्रशिक्षक किंवा तिचे पालक यांच्यात भेदभाव करत नाही. दोघांनाही पुरुष असल्यास स्टेडियममध्ये जाण्यास मज्जाव करण्यात आला होता. योगायोगाने, दुहेरीत एका जोडीसह १३ भारतीय महिला शटलर्स रिंगणात होत्या.



**बॅडमिंटनच्या सूत्रांनी सांगितल्यानुसार आयोजकांनी हे स्पष्ट केले आहे की जरी टूर्नामेंट प्रॉस्पेक्टसमध्ये पोडियम ड्रेस कोडचा उल्लेख नाही तरी महिला पदक विजेत्यांसाठी हिसाब अनिवार्य आहे. सूत्रांच्या मते, "प्रॉस्पेक्टस बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनच्या स्पर्धा नियमांमधील कपड्याच्या नियमांबद्दल बोलले होते, जे बहुतेक जगभरातील स्पर्धांमध्ये सामान्य आहे. तेहरानमध्ये महिलांनी बाहेर पडताना हिजाब अनिवार्य आहे हे आम्हाला माहीत होते, परंतु स्पर्धेदरम्यान त्यांच्या वापराबाबत कोणताही विशेष उल्लेख नव्हता."महिला शटलर्सना त्यांच्या सामन्यांदरम्यान लेगिंग किंवा हिजाब अशा कोणत्याही निर्बंधांचा सामना करावा लागला नाही. परंतु कोणत्याही पुरुष प्रेक्षकांना त्यांना खेळताना पाहण्याची परवानगी नव्हती.**

# कांगारु टीममध्ये आश्विनच्या फिरकीची भलतीच दहशत

। नागपुर । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया संघात ९ फेब्रुवारीपासून ४ सामन्यांची कसोटी मालिका खेळली जाणार आहे. या मालिकेतील पहिला सामना नागपुरात खेळला जाणार आहे. या मालिकेत नेतृत्वाची धुरा रोहित शर्मा आणि पॅट कमिन्सच्या खांद्यावर असणार आहे. या मालिकेपूर्वी उस्मान ख्वाजाने आर आश्विनबद्दल एक महत्वाचे वक्तव्य केले आहे.

ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर उस्मान ख्वाजा, जो गेल्या काही वर्षांमध्ये खूप यशस्वी ठरला आहे. तो म्हणाला की, रविचंद्रन अश्विनच्या नेतृत्वाखालील भारतीय फिरकी आक्रमण हे चार कसोटी सामन्यांच्या मालिकेत सर्वात कठीण आव्हान असेल. व्हिसा मिळण्यास उशीर झाल्याने पाकिस्तानात जन्मलेला ख्वाजा संघानंतर येथे दाखल झाला. तो डेव्हिड वॉर्नरसोबत डावाची सुरुवात करेल.उस्मान ख्वाजा सिडनी मॉर्निंग हेराल्डशी बोलताना म्हणाला,"ही एक वेगळीच अनुभूती आहे. या खेळात



कोणतीही हमी नाही पण फलंदाजी आणि गोलंदाजीत अधिक परिपक्वता आली आहे. गेल्या दहा वर्षांत आम्ही खूप काही शिकलो आहे. विशेषत: तुम्हाला कोणत्या प्रकारचे विकेट्स मिळतील. मला वाटते की आता आम्ही येथे कसोटी जिंकू शकतो. आता आम्ही पूर्वीपेक्षा चांगल्या स्थितीत आहोत, पण मालिका खूप खडतर असेल."

ऑस्ट्रेलियाने कसोटी मालिकेपूर्वी सराव सामना न खेळण्याचा निर्णय घेतला. त्याऐवजी बंगळुरूजवळील फिरकीपटूंना अनुकूल खेळपट्ट्यांवर सराव करणे चांगले. ते अश्विनला सर्वात मोठा धोका मानतात आणि त्याला सामोरे जाण्यासाठी 'डुप्लिकेट'ची मदत घेत आहेत.

ख्वाजा पुढे म्हणाला, "अश्विन एक तोफ आहे. तो खूप कुशल आहे आणि त्याच्याकडे विविधता आहे. जी तो खूप चांगल्या प्रकारे वापरतो.